नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १२२ Issue - 122 | वार - रविवार दि. २७ सप्टेंबर २०२६ Blow- Sunday Date 27 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# २६५ तालुक्यांत सरकारकडून कोरडा दुष्काळ जाहीर

## शेतकऱ्यांना दिलासा ; पंचनाम्याची कारवाई तात्काळ सुरु करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: सुपर एल निनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यात अत्यंत कमी प्रमाणात पाऊस झाल्याने बहुतांश जिल्ह्यांमध्ये भीषण दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळ जाहीर करून बळीराजाला दिलासा देण्याची मागणी जोर धरत होती. अखेर आज सरकारने राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला असून याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

राज्यात जूनपासून आतापर्यंतच्या कालावधीतील पर्जन्याची तूट व अन्य घटकांनी प्रभावित झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचं कृषी आयुक्तांच्या अहवालावरून दिसून येत आहे. सदर २६५ तालुक्यांमध्ये ट्रिगर-१ लागू असल्यामुळे तिथे पंचनामे करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी तात्काळ सुरू करावी. सर्व्हेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शवणारे छायाचित्र व जीपीएस कोऑडीनेट संकलन करून पीक परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांच्या मार्फत शासनास तात्काळ सादर करण्यात यावा, अशा सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

सरकारकडून कोणकोणत्या सवलती लागू करण्याचा निर्णय?

एकूण २६५ तालुक्यांतील दुष्काळग्रस्त भागासाठी राज्य शासनाकडून विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) जमीन महसूलात सूट
२) पीक कर्जाचे पुनर्गठन
३) शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती
४) कृषी पंपाच्या चालू विजबिलात सूट (७.५ हॉर्सपावर पर्यंत क्षमतेच्या विजपंपाचे वीज बिल अगोदरच माफ करण्यात आले आहे. त्यावरील वीज पंपांना सदर सूट लागू असेल)
५) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परिक्षा शुल्कात माफी
६) रोहयो अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरु करणे
७) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर
८) टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे
९) शेतीवर आश्रित शेतकरी/मजूर इत्यादी यांना अन्न धान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था उभी करणे
१०) जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था करणे
११) जलसंधारणाची कामे सुरु करणे
१२) अगोदरच निर्गमित करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे दरम्यान, सदर २६५ तालुक्यांमधील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेत पिकांच्या नुकसानीबाबतची मदत विहीत कार्यपद्धतीची पूर्तता करुन स्वतंत्र शासन निर्णयान्वये जाहीर केली जाणार आहे.




२६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर

श्रीवर्धन, रत्नागिरी, संगमेश्वर, राजापूर, सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला, मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा, धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर, एरंडोल, पारोळा, धरणगाव, चोपडा, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल, अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी, नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता, भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर, उ. सोलापूर, द. सोलापूर, बार्शी, अक्कलकोट मोहोळ, माढा, करमाळा पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा, मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ, सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा महाबळेश्वर, पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा, चंदगड, छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री, बदनापूर, घनसावंगी अंबड, जालना परतूर, मंठा भोकरदन, जाफ्राबाद, बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी, लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट, धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा, नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहुर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव, पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी, हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत, जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा, अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खं., धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर, अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर बार्शीटाकळी, वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा मानोरा, यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव, वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी, नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर, भंडारा, पवनी, लाखंदूर, तिरोडा, चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी, राजूरा कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, गडचिरोली, चार्मोर्शी

# महाराष्ट्रात १० दिवस पाऊस विश्रांती घेणार; पंजाबराव डख यांचा हवामान अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात यावर्षी अपेक्षित पाऊस पडलेला नाही. त्यामुळे शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. पावसाची वाट पाहून शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे. शेतकरी आजही आभाळाकडे पाहून पावसाची वाट पाहतोय. पण यंदा पावसाने पाठ फिरवली आहे. काही भागांमध्ये थोडाफार पाऊस पडतोय. पण एकदा येऊन गेल्यानंतर तो लवकर त्या भागामध्ये फिरकतही नाही. पावसाने जणू काही शेतकऱ्यांसोबत फारकत घेतली आहे की काय? असा तो वागतोय. पाऊस न पडल्यामुळे आता राज्यातील ७५ टक्के भागात कोरडा दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. तरीही शेतकऱ्यांना पावसाची आशा आहे. या दरम्यान हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी आजपासून पुढचे दहा दिवस पाऊस पडणार नाही. आकाश कोरडे राहील, असा अंदाज वर्तवला आहे. विदर्भात सध्या जोरदार पाऊस आहे. पूर्व विदर्भात जास्त पाऊस आहे. गडचिरोली, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये दोन दिवस मुसळधार पाऊस पडणार आहे. पण पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तिथले हवामान कोरडे होणार आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. २६ सप्टेंबरपासून १० दिवस पाऊस विश्रांती घेणार आहे. त्यानंतर परत राज्यात पाऊस येईल. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पाऊस येईल, असा महत्त्वाचा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.





हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात २६ सप्टेंबरला जळगाव जिल्ह्यातील काही भागांमध्ये वादळी पावसाची शक्यता आहे. यावेळी वाऱ्याचा वेग हा ताशी ४० ते ५० किमी प्रतितास राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाकडून जळगाव जिल्ह्याला २६ सप्टेंबरसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यांना देखील पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे. तर २८ सप्टेंबरला काही जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. या दिवशी पुणे घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर, कोल्हापूर जिल्हा, सातारा घाट परिसर, सांगली, बीड, धाराशिव या जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाची शक्यता आहे. या भागांना २८ सप्टेंबर रोजी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांत ट्रिगर-१ लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : खरीप हंगाम २०२६ मधील पर्जन्यमानातील तूट व अन्य दुष्काळी घटकांच्या आधारे सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये ढीळससशी-१ (प्रथम कळ) लागू करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस आणि मंगळवेढा या सर्व तालुक्यांचा दुष्काळी उपाययोजनांमध्ये समावेश करण्यात आला आहे.

ट्रिगर १ लागू झाल्याने जिल्ह्यातील संबंधित दुष्काळग्रस्त भागात पंचनाम्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे व त्र्झड कोऑर्डिनेट्स संकलित करून पिकांच्या परिस्थितीचा अहवाल कृषी आयुक्तांमार्फत शासनास सादर करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांना मिळणार विविध सवलती- शासन निर्णयानुसार सोलापूर जिल्ह्यातील लागू तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन आणि शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्यात येणार आहे. यामुळे पात्र शेतकऱ्यांना कर्ज परतफेडीचा तातडीचा आर्थिक ताण कमी करण्यास मदत होणार आहे. तसेच कृषी पंपाच्या चालू वीजबिलात सूट देण्याची तरतूद करण्यात आली आहे. ७.५ अश्वशक्तीपर्यंत क्षमतेच्या कृषी पंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले असून, त्यावरील क्षमतेच्या पंपांना या शासन निर्णयानुसार संबंधित सवलत लागू राहणार आहे.

टंचाईग्रस्त गावांमध्ये शेतीपंपांची वीज जोडणी खंडित न करण्याचे निर्देश-

टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या शेतीपंपाची वीज जोडणी खंडित न करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पाणीटंचाईच्या काळात उपलब्ध पाण्याचा शेतीसाठी वापर करण्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

पाणी, चारा आणि रोजगाराच्या उपाययोजनांनाही प्राधान्य- आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे, शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये यासाठी व्यवस्था करणे तसेच जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजना शासनाने निश्चित केल्या आहेत. याशिवाय जलसंधारणाची कामे सुरू करणे तसेच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागात पाणी उपलब्धता, रोजगार आणि पशुधनासाठी आवश्यक उपाययोजनांना प्रशासनाकडून प्राधान्य देण्यात येणार आहे.

पीक नुकसान मदतीबाबत स्वतंत्र शासन निर्णय-

महत्त्वाचे म्हणजे, या शासन निर्णयात शेतपिकांच्या नुकसानीबाबतची आर्थिक मदत अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. संबंधित विहित कार्यपद्धती पूर्ण केल्यानंतर शेतपिकांच्या नुकसानीबाबतची मदत स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाणार आहे, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांचा ढीळससशी-१ अंतर्गत समावेश झाल्याने संबंधित विभागांनी शासन निर्णयातील उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. पंचनामे, पिकांची वस्तुनिष्ठ स्थिती नोंदविणे, पाणीपुरवठा, चारा, रोजगार व जलसंधारणाच्या उपाययोजनांना स्थानिक परिस्थितीनुसार प्राधान्य देण्यात येणार आहे.

**विकासकामांऐवजी शेतकरी प्राधान्यक्रमावर, परिस्थितीनुसार मदतीचे स्वरूप बदलणार**


# दुष्काळाचा पंचनामा शेतकऱ्यांसमोरच होणार : मंत्री बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दुष्काळी परिस्थितीत नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे शेतकऱ्यांसमोरच आणि अचूक पद्धतीने करण्याचे निर्देश देण्यात आले असून, पंचनाम्यातील चूक शेतकऱ्यांच्या मदतीच्या आड येऊ नये, याची दक्षता घेतली जाईल, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी दिली. राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाही झाला असला, तरी ही संख्या अंतिम नसून परिस्थितीतील बदल आणि नव्या 'ट्रिगर'नुसार आणखी तालुक्यांचा समावेश केला जाऊ शकतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या काळात पायाभूत सुविधांपेक्षा शेतकरी आणि शेतमजूर हेच सरकारचे प्राधान्य असेल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष म्हणून बावनकुळे यांनी सरकारच्या उपाययोजनांची माहिती दिली. शासन निर्णय जारी झाल्यानंतर तातडीने त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून, दुष्काळात प्रशासनाने पंचनामे किंवा निर्णयांची वाट पाहत बसण्याऐवजी प्रत्यक्ष उपाययोजना सुरू करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पिण्याच्या पाण्याचे नियोजन जिल्हाधिकाऱ्यांकडून करण्यात येणार असून, मंत्रिमंडळ उपसमिती दर मंगळवारी परिस्थितीचा आढावा घेणार आहे. दुष्काळ निश्चित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध निकषांनुसार पहिल्या टप्प्यात २६५ तालुक्यांचा समावेश झाला आहे. मात्र, एखाद्या तालुक्यातील परिस्थिती पुढील काळात बदलल्यास किंवा अन्य 'ट्रिगर' पूर्ण झाल्यास त्या तालुक्याचा समावेश करण्याचा निर्णय घेता येईल. त्यामुळे सध्या जाहीर झालेली संख्या अंतिम मानता येणार नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. राज्यातील परिस्थितीचा सातत्याने आढावा घेऊन त्यानुसार निर्णय बदलले जातील, असे त्यांनी सांगितले.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी पिकांच्या नुकसानीचे अचूक पंचनामे होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. शेतकऱ्यांसमोरच पंचनामा करण्यात यावा, जेणेकरून नुकसानीचे योग्य मूल्यमापन होईल आणि नोंदीत त्रुटी राहणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. पंचनाम्यात चूक झाली तर त्याचा परिणाम शेतकऱ्याला मिळणाऱ्या मदतीवर होऊ शकतो. त्यामुळे या प्रक्रियेचे बारकाईने निरीक्षण करण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) निकषांनुसार मदत मिळविण्यासाठीही अचूक पंचनामे आवश्यक असतात. त्यामुळे केंद्राकडून जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी आवश्यक ती सर्व प्रक्रिया राज्य सरकारकडून पूर्ण केली जाईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.



दुष्काळी परिस्थितीत शेतकरी आणि शेतमजूर यांना सर्वाधिक प्राधान्य देण्यात येईल आणि आवश्यकतेनुसार पायाभूत सुविधा किंवा अन्य विकासकामांपेक्षा दुष्काळ निवारणाच्या कामांना महत्त्व दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. जलसंधारणाच्या कामांवर भर देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. पाण्याचा वापर नियंत्रित करण्यासाठी परिस्थितीनुसार नियम करावे लागतील. ज्या भागांत स्विमिंग पूल किंवा मोठ्या प्रमाणात बांधकामे आहेत, तेथे भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन पाण्याच्या वापराबाबत नियमन करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर आणि अमरावतीमध्ये सध्या एकही सिमेंटचा रस्ता मंजूर न करण्याचे आदेश दिल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले. त्याऐवजी जलसंधारणाची कामे हाती घेऊन तलाव मजबूत करण्यावर भर देण्याची भूमिका त्यांनी मांडली. सिमेंटच्या रस्त्यांपेक्षा पाणी साठवण आणि जलसंधारणाची कामे अधिक महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांशी चर्चा करून दुष्काळी परिस्थितीच्या गरजेनुसार जिल्हा नियोजन समितीमधील कामांना प्राधान्य दिले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

सावकारांनी शेतकऱ्यांना त्रास दिल्यास कठोर कारवाई

दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत आहे की नाही, याचे निरीक्षण करण्यासाठी आपण स्वतः जिल्ह्यांचा दौरा करणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. यवतमाळ, वर्धा, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांना भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी करणार असून, शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उपलब्ध आकडेवारीनुसार परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर एखादा भाग त्यातून सुटला आहे का, याचीही तपासणी केली जाईल. शासन निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि त्याचे निरीक्षण महत्त्वाचे असून, त्यावर आपण लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दुष्काळाच्या काळात शेतकऱ्यांना सावकारांकडून होणाऱ्या त्रासाबाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. अवैध सावकारीच्या जाळ्यात अडकलेल्या शेतकऱ्यांनी शासनाकडे पत्राद्वारे तक्रार करावी, त्यावर कारवाई करण्यात येईल, असे बावनकुळे यांनी सांगितले. वैध सावकारांकडूनही शेतकऱ्यांचा छळ होणार नाही, याची दखल घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दुष्काळाच्या प्रश्नावर विरोधकांनी राजकारण करू नये, असे आवाहनही बावनकुळे यांनी केले. कर्नाटकातील परिस्थितीचा संदर्भ देऊन राज्य सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही, असा आरोप करणे चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी दुष्काळाबाबत काही सूचना किंवा मागण्या असल्यास त्या मंत्रिमंडळ उपसमितीसमोर मांडाव्यात, त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची सरकारची तयारी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणारी वक्तव्ये करण्याऐवजी चर्चेतून प्रश्न मांडावेत, असे आवाहन त्यांनी केले.

# औषधविक्रेता: औषधांचे परीक्षण, वितरण आणि रुग्णांच्या आरोग्याचे निरीक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(२५-३० सप्टेंबर:वर्ल्ड फार्मासिस्ट डे- विश्व औषधविक्रेते दिन सप्ताह.)**

वर्ल्ड फार्मासिस्ट डे दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश फार्मासिस्टच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची जाणीव करुन देणे आणि औषधांच्या सुरक्षित वापरासाठी त्यांच्या योगदानाची प्रशंसा करणे हा आहे. फार्मासिस्ट हे आरोग्य सेवेत महत्त्वाची कडी आहेत. ते औषधे योग्य प्रमाणात आणि योग्य प्रकारे रुग्णांना उपलब्ध करून देतात. औषधांचे दुष्परिणाम, डोस आणि वापर याबाबत ते रुग्णांना सल्ला देतात. याशिवाय, आरोग्य व्यवस्थापनात औषधांचे परीक्षण, वितरण आणि रुग्णांच्या आरोग्याचे निरीक्षण करण्याचे काम ते करतात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी सदर मार्गदर्शक संकलित लेख वाचकांना समर्पित करताहेत जी.... संपादक.

वर्ल्ड फार्मासिस्ट डे ही जागतिक फार्मास्युटिकल फेडरेशनने (FIP) २००९ मध्ये सुरू केली होती. यावर्षीचा मुख्य विषय फार्मासिस्ट्स स्ट्रेंथनिंग हेल्थ सिस्टिम्स आहे, ज्यामध्ये फार्मासिस्टांच्या कौशल्यांचा, ज्ञानाचा आणि अचूकतेचा महत्त्वपूर्ण वाटा अधोरेखित केला जातो. या दिनाचे उद्दिष्ट म्हणजे फार्मासिस्टच्या कामाचे कौतुक आणि त्यांच्याद्वारे समाजाला दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवेचे महत्त्व दाखवणे. औषधविक्रेता (Pharmacist / Chemist / Druggist) म्हणजे अशी व्यक्ती ज्यांच्याकडे औषधांची निर्मिती, साठवणूक, वितरण आणि विक्री करण्याचे अधिकृत ज्ञान आणि परवाना असतो. वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टरांइतकेच औषधविक्रेत्यांचे स्थानही अत्यंत महत्त्वाचे असते, कारण ते डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतात.

औषधविक्रेत्यांबद्दलची सविस्तर माहिती- १ औषधविक्रेत्याची मुख्य कामे आणि जबाबदाऱ्या: औषधांचे वितरण: डॉक्टरांनी लिहून दिलेल्या चिठ्ठीनुसार रुग्णांना अचूक औषधे देणे, रुग्णांना मार्गदर्शन: औषध कधी घ्यावे, कसे घ्यावे (उदा. जेवणापूर्वी की जेवणानंतर), त्याचे संभाव्य दुष्परिणाम काय असू शकतात, याबद्दल रुग्णाला समजावून सांगणे, ॰ औषधांची साठवणूक: औषधे खराब होऊ नयेत म्हणून ती योग्य तापमानात (उदा. फ्रीजमध्ये किंवा थंड ठिकाणी) सुरक्षित ठेवणे, ॰ कालबाह्य औषधांची तपासणी: दुकानातील किंवा रुग्णालयातील औषधांची एक्सपायरी डेट तपासून ती बाजूला करणे. २ औषधविक्रेता (फार्मासिस्ट) कसे बनावे? भारतात औषधविक्रेता किंवा फार्मासिस्ट होण्यासाठी विज्ञान शाखेतून १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर खालील व्यावसायिक कोर्सेस करावे लागतात: D.Pharm (डिप्लोमा इन फार्मसी): हा दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम आहे. स्वतःचे मेडिकल स्टोअर सुरू करण्यासाठी हा सर्वात लोकप्रिय पर्याय आहे. B.Pharm (बॅचलर ऑफ फार्मसी): हा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आहे. याद्वारे औषध निर्मिती कंपन्यांमध्ये मोठ्या संधी मिळतात. M.Pharm (मास्टर ऑफ फार्मसी): बी.फार्म नंतर संशोधनासाठी केला जाणारा हा दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम आहे. कोर्स पूर्ण झाल्यानंतर ''महाराष्ट्र राज्य औषधनिर्माण परिषद'' (MSPC) कडे नोंदणी करून परवाना मिळवावा लागतो. ३ स्वतःचे औषधाचे दुकान (Medical Store) सुरू करण्यासाठी पात्रता - जर तुम्हाला स्वतःचे मेडिकल सुरू करायचे असेल, तर खालील गोष्टी आवश्यक आहेत: अर्जदार स्वतः नोंदणीकृत फार्मासिस्ट असावा किंवा त्याने त्याच्या दुकानात पूर्णवेळ फार्मासिस्ट नियुक्त केलेला असावा. अन्न व औषध प्रशासन (FD) कडून मिळणारा ड्रग लायसन्स, दुकानाचा निश्चित नकाशा/जागा आणि औषध साठवणुकीसाठी रेफ्रिजरेटर (फ्रीज). .४ करिअरच्या संधी- औषध निर्माण क्षेत्रात करिअरच्या अनेक उत्तम संधी उपलब्ध आहेत. स्वतःचे मेडिकल स्टोअर सुरू करणे किंवा दुसऱ्या मेडिकलमध्ये फार्मासिस्ट म्हणून काम करणे (Hospital Pharmacist): सरकारी किंवा खाजगी रुग्णालयांमधील फार्मसीमध्ये काम करणे. (Pharmaceutical Industry)-औषध तयार करणाऱ्या कंपन्यांमध्ये रिसर्च, प्रोडक्शन किंवा क्वालिटी कंट्रोल विभागात काम करणे- Medical Representative (MR): वेगवेगळ्या डॉक्टरांना भेटून आपल्या कंपनीच्या औषधांची तांत्रिक माहिती देणे,

निर्माण उद्योग- औषधनिर्माण उद्योग हा एक जागतिक स्तरावरचा सतत वाढ होत असलेला उद्योग आहे. एक नवीन औषध बाजारात येण्यापूर्वी त्यावर अनेक वर्षे संशोधन होते, कोट्यवधी रुपये खर्च येतो. अन्न व औषधी प्रशासनातील काही चांगल्या अधिकाऱ्यांमुळे राज्यात औषधांच्या दुकानात फार्मसिस्ट नेमण्यात आले. महाराष्ट्रात औषध दुकानाचा व्यवसाय कसा सुरू कराल? तर टप्प्याटप्प्याने मार्गदर्शन फार्म पात्रता प्रमाणपत्र; महाराष्ट्र राज्य औषधनिर्माण परिषदेद्वारे जारी केलेले औषधविक्रेता नोंदणी प्रमाणपत्र; आधार कार्ड, पॅन कार्ड किंवा इतर प्रमाणपत्र जोडावे लागतात.

नवीन औषधांची निर्मिती, जी औषधे आहेत, त्यांच्यात काळानुसार बदल, विकास करणं आणि औषधांचं वितरण आदी कामं या क्षेत्रातील पदवीधर करतात. औषधे देताना रुग्णास त्या औषधांची सविस्तर माहिती फार्मासिस्ट सांगतो व सोबत औषध माहितीपत्रकही घरी नेण्यास देतो. फार्मासिस्ट म्हणजे औषधांचा तज्ञच होय! विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय औषधविक्रेता दिनाच्या समस्त आरोग्यसेवेत स्वतःला वाहून घेतलेल्या भावाबहिनींना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन-**
**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**( दिनविशेषकार)**
**मु. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.**

# अण्वस्त्र निर्मूलनः मानवी अस्तित्व आणि पृथ्वीवरील सजीव सृष्टीचे रक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(२६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर:आंतरराष्ट्रीय अण्वस्त्र निर्मूलन दिन सप्ताह. )**

आंतरराष्ट्रीय अण्वस्त्र निर्मूलन दिन हा दिवस २६ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट जगातील सर्व अण्वस्त्रांचा पूर्णपणे नाश करून शांतता आणि सुरक्षितता निर्माण करणे आहे. अण्वस्त्रांचा धोका हा मानवी अस्तित्वासाठी सर्वात मोठ्या धोक्यांपैकी एक आहे, आणि त्याचा वापर विनाशकारी परिणाम करू शकतो. संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश अण्वस्त्रांच्या निर्मूलनासाठी जागरूकता निर्माण करणे आणि आंतरराष्ट्रीय समुदायाला या धोक्याचा सामना करण्यासाठी एकत्र आणणे आहे. सदर मार्गदर्शक संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करताहेत जी....संपादक.

अण्वस्त्रांची शर्यत थांबवणे, ॰ या शस्त्रांच्या वाढीस प्रतिबंध करणे, आणि अण्वस्त्रविरहित जगाची उभारणी करणे हे या दिवसाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या दिवसाद्वारे अण्वस्त्रांच्या वापराचे गंभीर परिणाम लोकांसमोर आणले जातात आणि शांततापूर्ण उपाययोजनांसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले जाते. दरवर्षी २६ सप्टेंबर हा दिवस अण्वस्त्रांच्या संपूर्ण निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून पाळला जातो. अण्वस्त्र निर्मूलन म्हणजे काय? तर जगातून सर्व अण्वस्त्रे- अणुबॉम्ब आणि घातक आण्विक शस्त्रास्त्रे पूर्णपणे नष्ट करणे म्हणजेच अण्वस्त्र निर्मूलन होय. १) मानवी जीवितहानी, २) पर्यावरणाचा विनाश आणि ३) जागतिक सुरक्षा धोक्यात येऊ नये. म्हणून संयुक्त राष्ट्र- युएन व विविध देश निःशस्त्रीकरणाचा प्रचार करतात.

पार्श्वभूमी आणि इतिहास: संयुक्त राष्ट्रांनी सन २०१३ मध्ये ठराव मंजूर करून २६ सप्टेंबर हा दिवस अण्वस्त्र निर्मूलन दिन म्हणून घोषित केला. सन १९४५ मध्ये जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर झालेल्या अणुबॉम्ब हल्ल्याच्या भीषण परिणामानंतर जगात अण्वस्त्रांविरोधात मोठी जाणीव निर्माण झाली. सद्यस्थितीत जागतिक अण्वस्त्र साठा असा- जगात सध्या ९ देशांकडे अण्वस्त्रे आहेत. ॰ रशिया आणि अमेरिका यांच्याकडे जगातील सर्वाधिक सुमारे ८६% अण्वस्त्रे आहेत. ॰ भारताकडे सुमारे १९० अण्वस्त्रे असून भारताचे धोरण आधी अण्वस्त्र वापरणार नाही- No First Use यावर आधारित आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अणुयुगाचा प्रारंभ झाला, जेव्हा अनेक देशांनी अण्वस्त्रांची स्पर्धा सुरू केली. सुरुवातीला, शीतयुद्धाच्या भू-राजकारणाच्या परस्परपूरक संदर्भात आणि प्रभावी आंतरराष्ट्रीय निःशस्त्रीकरण धोरणांच्या अभावामुळे, अमेरिका, सोव्हिएत संघ, युनायटेड किंगडम, फ्रान्स आणि चीनसारखे देश सन १९४५-१९६४ दरम्यान अण्वस्त्रधारी शक्ती बनले. कॅट्झ २००८ ; शेंक आणि युमन्स २०१२ या काळात जगभरातील सर्व वातावरणांमध्ये- वातावरण, जमिनीखाली आणि पाण्याखाली मोठ्या संख्येने अणुचाचण्या घेण्यात आल्या. याच काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघाने वातावरणात मोठ्या संख्येने अणुचाचण्या केल्या. याची सर्वात प्रातिनिधिक उदाहरणे म्हणजे सन १९५४ मध्ये अमेरिकेने मार्शल बेटांवरील बिकिनी प्रवाळद्वीपावर कॅसल ब्राव्हो चाचणी आणि सन १९६१ मध्ये सोव्हिएत संघाने उरल पर्वतांच्या उत्तरेकडील नोव्हाया झेम्लिया द्वीपसमूहात सत्सार चाचणी केलेले हायड्रोजन बॉम्बचे पहिले अणुस्फोट- गुडबी २००५ घडविले. वातावरणात आतापर्यंत झालेल्या सर्वात शक्तिशाली अणुचाचण्यांमुळे झालेले गंभीर पर्यावरणीय नुकसान, तसेच जागतिक अणुशस्त्र चाचण्यांच्या सर्वसाधारण पार्श्वभूमीने, अणुशस्त्र चाचण्या पूर्णपणे बंद करण्यासाठी मोठ्या प्रमाणावरील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या पहिल्या टप्प्यासाठी पाया तयार केला आहे. अशाप्रकारे सन १९६३ हे वर्ष मर्यादित चाचणी बंदी कराराच्या- एलटीबीटी अंमलात येण्याने एक महत्त्वाचा टप्पा ठरले. या करारानुसार भूमिगत भाग वगळता जगातील सर्व वातावरणात अणुशस्त्र चाचण्यांवर बंदी घालण्यात आली होती - रुबिन्सन २०११. जरी फ्रान्स आणि चीन या दोन प्रमुख देशांनी या करारावर स्वाक्षरी केली नसली तरी- मास्टनी २००८, कारण या देशांनी वातावरणात त्यांच्या अणुशस्त्र चाचण्या सुरूच ठेवल्या होत्या, तरीही सन १९६३ पासून दोन्ही गोलार्धांतील वातावरणातील किरणोत्सर्गी समस्थानिकांना मर्यादित ठेवण्यात या कराराचा खरा प्रभाव पडला-लेविन इत्यादी तसेच मॅनिंग आणि मेलहुइश १९९४.

सन १९६८ मध्ये अण्वस्त्र प्रसारबंदी करार- एनपीटी लागू होणे, ज्याने पाच विद्यमान अणुशक्ती असलेल्या देशांना वगळून जगातील सर्व देशांना अण्वस्त्रधारी बनण्यावर बंदी घातली, अण्वस्त्रांची स्पर्धा आणि अप्रत्यक्षपणे अण्वस्त्र चाचण्या संपवण्याच्या प्रयत्नांमधील हा आणखी एक महत्त्वाचा क्षण होता- व्हॅन डर मीर २०११. जरी या करारातील तरतुदींची अंमलबजावणी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या- आईएईए मदतीने होणार होती- वेट्झ २०११, तरी गेल्या चार दशकांतील भू-राजकीय अनुभवांनी हे दाखवून दिले आहे की एनपीटीच्या कक्षेबाहेर, भारत, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, उत्तर कोरिया आणि वरवर पाहता इस्रायल- अनिर्दिष्ट अणुस्थिती यांचा समावेश असलेल्या अण्वस्त्रधारी देशांची एक वेगळी श्रेणी उदयास आली आहे- मॅकडोनेल २०१३ आणि यापैकी काही देश स्वतःच्या अण्वस्त्र चाचण्या घेतच आहेत. सन १९९६मध्ये संयुक्त राष्ट्रांनी सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार- सीटीबीटी १९९६ स्वीकारल्याने, सर्व प्रकारच्या अणुचाचण्या थांबवण्याच्या एका नवीन पर्वाची सुरुवात झाली. तथापि १९४५ ते २०१३ या काळात वातावरणात आणि जमिनीखाली मोठ्या संख्येने केलेल्या अणुचाचण्या जशी शेवटची अणुचाचणी उत्तर कोरियाने केली होती, त्यांच्या किरणोत्सर्गी कचऱ्यामुळे सध्याचे पर्यावरणाचे प्रदूषण झाले आहे, ज्यामुळे किरणोत्सर्गाच्या उच्च पातळीमुळे अनेक स्थळे पर्यावरणीय आणि सामाजिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाली आहेत. प्रस्तुत अभ्यास हा अणुबॉम्ब चाचण्यांमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय परिणामांच्या विश्लेषणावर आधारित असून, त्यात प्रामुख्याने जागतिक आणि प्रादेशिक संदर्भांतील वातावरणीय व सागरी पर्यावरणीय प्रदूषणाच्या मुद्द्यावर, तसेच किरणोत्सर्गी प्रदूषणामुळे मानवावर होणाऱ्या परिणामांसंबंधीच्या विशिष्ट बाबींवरील चर्चा आहे.

अण्वस्त्र निर्मूलन किंवा निःशस्त्रीकरणाचा अर्थ जगातल्या विनाशाची भीती निर्माण करणाऱ्या अण्वस्त्रांची संख्या पूर्णपणे संपवणे किंवा कमी करणे हा आहे. अण्वस्त्रांच्या संपूर्ण निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस हा दरवर्षी २६ सप्टेंबर रोजी पाळला जातो.

महत्त्वाची माहिती: १) उद्देश: जगातून अणुयुद्धाचा धोका संपवणे आणि जागतिक शांतता प्रस्थापित करणे. २) सध्याची स्थिती: जगभरात अमेरिका, रशिया, चीन, भारत, पाकिस्तान यांसारख्या मोजक्या देशांकडे अण्वस्त्रे आहेत. रशिया आणि अमेरिकेकडे सर्वाधिक अण्वस्त्रसाठा आहे. ३) अण्वस्त्र निर्मूलनाची गरज: ॰ अणुबॉम्बच्या एका स्फोटाने लाखो लोकांचा जीव जातो आणि पुढच्या पिढ्यांवरही घातक परिणाम होतात. ॰ पर्यावरणाचा नाश होतो आणि पृथ्वीवरील सजीव सृष्टी धोक्यात येते. ॰ महासत्तांमधील स्पर्धा थांबवण्यासाठी निःशस्त्रीकरण आवश्यक आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय अण्वस्त्र निर्मूलन दिनाच्या समस्त मानव परिवारास हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(दिनविशेषकार)**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# पर्यटन आणि नोकरीची संधी : सर्वांसाठी चांगले भविष्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(२७ सप्टेंबर ते ०३ ऑक्टोबर:जागतिक पर्यटन दिन सप्ताह. )**

जागतिक पर्यटन दिन दरवर्षी २७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. याचा उद्देश जागतिक स्तरावर पर्यटनाचे महत्त्व आणि त्याचा आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय परिणाम यावर प्रकाश टाकणे आहे. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यटन संघटनेने- युएनडब्ल्पूटीओने हा दिवस सन १९८० मध्ये प्रथम साजरा करण्यास सुरुवात केली. पर्यटन उद्योग हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा क्षेत्र असून तो ॰ रोजगार निर्मिती, ॰ आर्थिक वाढ, आणि ॰ सांस्कृतिक आदानप्रदानाचा प्रमुख स्रोत आहे. सदर मार्गदर्शक संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करताहेत जी... संपादक.

पर्यटनाने वेगवेगळ्या संस्कृती, परंपरा, आणि निसर्गाचे सौंदर्य अनुभवण्याची संधी मिळते. या दिवसाचे महत्त्व वाढते कारण पर्यटनामुळे जागतिक एकात्मता वाढते आणि विविध देशांमधील परस्पर समजूतदारपणा वाढतो. सन २०२३ च्या जागतिक पर्यटन दिनाचा थीम होता पर्यटन आणि हरित गुंतवणूक, ज्यामुळे शाश्वत आणि पर्यावरणपूरक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जात आहे.

दरवर्षी २७ सप्टेंबर हा दिवस जगभरात जागतिक पर्यटन दिन (थींश्रव ढींीळीा ऊू) म्हणून साजरा केला जातो. पर्यटन दिनाचा इतिहास- १) सुरवात: संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्था- पुएनडब्ल्यूटीओची स्थापन दि.२७ सप्टेंबर १९७० रोजी झाली. २) पहिला दिन: या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन १९८० पासून अधिकृतपणे हा दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली. ३) उद्देश: पर्यटन क्षेत्राचा जागतिक स्तरावर प्रचार करणे आणि संस्कृतींची देवाणघेवाण वाढवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

पर्यटनाचे महत्त्व- ॰ अर्थव्यवस्था: पर्यटनामुळे देशाच्या आणि स्थानिक पातळीवरील अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळते. ॰ रोजगार: हॉटेल, परिवहन, मार्गदर्शक आणि हस्तकला उद्योगात अनेक नवीन रोजगार निर्माण होतात. ॰ सांस्कृतिक एकता: नवनवीन ठिकाणच्या संस्कृती, खाद्यान्न आणि परंपरांची माहिती मिळते. यामुळे जगभरात बंधुभाव वाढतो.

आज २७ सप्टेंबर हा दिवस जागतिक पर्यटन दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. सन १९८० पासून जागतिक पर्यटन दिन याच दिवशी साजरा करण्यास सुरुवात झाली, कारण संयुक्त राष्ट्राच्या जागतिक पर्यटन संस्थेची स्थापना १९७० मध्ये याच दिवशी झाली होती. सन २०१८मध्ये ''पर्यटन आणि डिजिटल परिवर्तन'' हे मुख्य उद्दिष्ट ठेवून पर्यटन दिन साजरा केला गेला. पूर्ण वर्षभर जगभरातील सर्व देशांनी त्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम, योजना, सुविधा यांचे नियोजन केले. तर सन २०१९ साली पर्यटनदिनासाठी विषय होता तो म्हणजे पर्यटन आणि नोकऱ्या: सर्वांसाठी चांगले भविष्य!

पर्यटन क्षेत्रातील कारकीर्द: ज्यांना मुक्त भटकायची, मनमुराद फिरायची आवड आहे अशांना पर्यटन क्षेत्रात कारकीर्द करणे सहज शक्य झाले आहे. आवडीची कारकीर्द झाल्यास मिळणारा आनंद मोठा असतो. दळवळणाच्या सुविधा वाढल्याने मुक्तसंचार करणे आता सोपे झाले आहे. देशाच्या कुठल्याही प्रदेशात किंवा परदेश गमन करण्याकडे अलीकडे लोकांचा कल वाढू लागला आहे. वर्षभरात पर्यटन या क्षेत्रात २५ टक्क्याने वाढ होते. पर्यटन व्यवस्थापन आणि नियोजन या अभ्यास शाखाही आता महाविद्यालयीन शिक्षणात आल्या आहेत. अनेक परदेशी पर्यटन कंपन्या या क्षेत्रात गुंतवणूक करत आहेत. देशातही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो आहे. सार्वजनिक आणि खाजगी स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने कारकीर्दच्या या क्षेत्राचा घेतलेला खास आढावा- १) पात्रता: ट्रॅव्हल आणि टुरिझम या विषयात पदवीसाठी बारावी पास आणि पदव्युत्तर पदवीसाठी कोणत्याही विषयातील पदवी आवश्यक आहे. २) आवश्यक गुण: या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी फिरण्याची आवड असायला हवी, तसेच संवाद कौशल्य उत्तम असणे आणि दोनपेक्षा अधिक भाषेवर प्रभुत्व असायला हवे. काही परदेशी भाषा आत्मसात असल्यास खूप फायद्याचे ठरते. भौगोलिक प्रदेशांची उत्तम जाण असायला हवी. सहकार्यवृत्ती आणि प्रतिकूल परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य असेल तर लोकांमध्ये पटकन एकरूप होणे सोपे होते. सामाजिक नितीनियमांचा आणि परंपरांचा आदर करणेही गरजेचे असते. त्याचबरोबर त्या देशाचा इतिहास, कला आदीची प्राथमिक माहिती हवी. ३) कोणत्या विभागात काम करू शकतो?: निवास, वाहतूक, अन्न, समारंभ, साहसी पर्यटन आदी सेवा देणारे हे क्षेत्र आहे. तुमच्या आवडीनिवडीनुसार यातील अनेक विभागातही काम करता येईल. ४) संधी: स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून पर्यटन विभागात नोकरीच्या संधी मिळतात. पर्यटन संचालनालयाच्या माध्यमातूनही अनेक पदे भरली जातात. सरकारी नोकरीत येण्यासाठी मात्र या विषयातील पदवीप्राप्त असणे गरजेचे आहे. तसेच अनेक परदेशी कंपन्यात संधीही आहेत. अनेक विमानसेवा प्रदान करणाऱ्या कंपन्यांना या क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची आवश्यकता असते. खाजगी समूहात व्यवस्थापन आणि आदी बाबींसाठी उत्तम वेतनही मिळते. पर्यटन विभाग: आरक्षण, विपणन, विक्री, नियोजन, मार्गदर्शन यासाठी अनेक जागा भरल्या जातात. ५) माहिती साहाय्यक: हा उपलब्ध पर्यटनसंबंधी जागा आणि तिथे मिळणाऱ्या सेवांची तपशीलवार माहिती देण्याचे काम करतो. त्याच्या सहकार्यामुळे प्रवाशांना योग्य नियोजन करण्यास मदत होते. ६) गाईड- मार्गदर्शक: पर्यटन मंत्रालय गाईडला मान्यता देते. प्रादेशिक, राज्य आणि स्थानिक असे तीन प्रकार त्यात पडतात. या परवान्याचे दर दोन वर्षांनी नूतनीकरण करता येते. स्थळांची सविस्तर आणि इत्यंभूत माहिती देणे आणि सांस्कृतिक परंपरा आदीची माहिती देण्याचे काम गाईड करत असतो. त्याच्याकडे उत्तम संवाद कौशल्य असायला हवे, कारण तो प्रत्यक्ष स्थळांवर जाऊन मार्गदर्शन करत असतो. एकंदरीत गाईड हा महत्त्वाचा दुवा असतो. ७) टूर ऑपरेटर्स: हे प्रवासाचे संपूर्ण नियोजन करतात. टूर गाईड म्हणून अनुभव आल्यानंतर या पदावर काम करता येते. ८) ट्रॅव्हल एजन्सी: यांचे अनेक लोक ग्राहकांना एजन्सीशी जोडतात. आता ऑनलाइनही ग्राहक जोडता येतात. ग्राहकांशी संवाद साधून अनेक प्लॅन ते देत असतात आणि ग्राहकांना कंपनीशी संपर्क करून देतात. ९) हॉटेल क्षेत्र: पर्यटन आणि हॉटेल क्षेत्र या दोन्हींचा संबंध अनन्यसाधारण आहे. प्रवासात मुक्कामाची सोय करण्याचे काम एकमेकांच्या सहाय्याने केले जाते. यावर आकर्षक सवलती देऊन ग्राहक मिळवण्याकडे कल असतो. जवळजवळ एक लाख कुशल मनुष्यबळाची गरज या व्यवसायाला सध्या आहे.१०) विमान कंपन्या: विमान कंपन्यासाठी काम करणेही वेगळा आनंद देणारी संधी असते. इतर व्यवस्थापन अभ्यासक्रम पूर्ण असल्यास प्राधान्याने संधी मिळते. त्याचबरोबर आकर्षक वेतनही दिले जाते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय पर्यटन दिवसाच्या समस्त पर्यटक बांधवाना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(एक निसर्ग प्रेमी)**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- ९६९९८३६७१७.**

# जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : व्हीटीबी (VTB) बॅडमिंटन अकॅडमी, सांगोला येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या वाखरी, पंढरपूर येथील ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची विभागीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा क्रीडा अधिकारी दत्ता वरकड, रेफरी तुषार मुळे आणि क्रीडा शिक्षक प्रवीण पिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडली. मुलींमधून एमआयटी ज्यू. कॉलेजच्या अपर्णा चव्हाण, श्रद्धा महाडिक, संजना बाड, अनुष्का चाकूर आणि आर्या कुलकर्णी या विद्यार्थ्यांची पुणे विभागीय बॅडमिंटन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच मुलांच्या जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत शुभंकर गारे, राजवीर बोरसुरे, विराज खरसडे, मल्हार नांदगावकर आणि दक्ष पटेल यांच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला. शुभंकर गारे व पृथ्वीराज भाळवणकर यांची डिव्हिजन ट्रायलसाठी निवड झाली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षकवृंद व क्रीडा विभागाच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मौजे शेटफळ यां गावांतील भीम नगरमधील रहिवाशावर जातीयवादी गांवगुंडानी सामूहिकपणे केलेल्या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शिव, फुले, शाहू, आंबेडकर विचारांच्या पुरोगामी असलेल्या महाराष्ट्र राज्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा बालेकिल्ला म्हणून ओळखत असलेल्या आणि जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अस्थि असलेल्या मो-होळ तालुक्यामधील शेटफळ या गाव-ातील महार, मांग, चांभार व बौद्ध सम ाजाचे लोक एकत्रितपणे गुण्यागोविंदाने राहत असताना मौजे शेटफळ गाव-ातील सिद्धप्पाच्या मंदिरामध्ये मांग समाजातील कांही तरुण लोकांनी हार घातल्याचा मनामध्ये राग धरत तसेच मौजे शेटफळ गावातील एका शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर महार समाजातील रहिवासी असलेल्या तरुण शेळी चारत असताना गांवातील गांवगुंड



तुम्हा महारा-मांगांना आमचा देवधर्म चालत नाही.तर तुम्ही आमच्या देवळात का येता व आमच्या बांधावर तुमच्या शेळ्या का चारताय असे म्हणत मारहाण केली.यानंतर शेटफळ या गावांमधील गाव गुंडांनी पूर्वनियोजित कट करून ३००-४०० लोकांनी एकत्रित मिळुन मौजे शेटफळ येथील भीम नगरवर सामूहिक हल्ला करून नंग्या तलवारीने हल्ला करून अनेक रहिवाशांना मोठ्या प्रमाणात जखमी केलेले आहे.त्यांची विचारपूस करण्यासाठी सोलापुरातील छ.शिवाजी महाराज शासकीय सर्वो पचार रुग्णालयांमध्ये उपच-ार घेणाऱ्या जखमीची व तब्येतीची विचारपूस करून झाल्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चर्मकार समाजाचे ज्येष्ठ नेते अशोकजी आगावणे, प्रा.सिद्धार्थ जाधव, राजरत्न फडतरे तसेच अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीचे समन्वयक व निमंत्रक राजाभाऊ सोनकांबळे यांनी भेट देऊन त्यांच्या उपचारा संदर्भात सविस्तर चर्चा केली. यानंतर मौजे शेटफळ या गाव-ातील जातीवादी गांव गुंडावर भारतीय न्याय संहिता (BNS) अनुसूचित जाती अत्त्याचार विरोधी प्रतिबंधक कायद्यानुसार तसेच भिम नगरमधील रहिवाशावर सामूहिक सामूहिक जीव-घेणा हल्ला व या गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याबाबत मा. पोलीस अध-ीक्षक, ग्रामीण विभाग, सोलापूर, मा. जिल्हाधिकारी आणि मा.सदस्य सचिव, सामाजिक न्याय विभाग तथा समाज कल्याण अधिकारी यांना भेटून उर्वरित आरोपींचा शोध घेऊन त्यांनाही तात्काळ अटक करण्याबाबत गंभीर तक्रारी स्वरूपाचे निवेदन देणार असल्याचे नमूद केले आहे.

# डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयाचा ३५ वा वर्धापन दिन व कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला/ प्रतिनिधी- बुधवार दि .२३ सप्टेंबर रोजी डॉ. गणपतराव देशम ुख महाविद्यालय सांगोला येथे महाविद्यालयाचा ३५ वा वर्धापन दिन व कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९ वी जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला व न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक, प्राथमिक, म ाध्यमिक व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.



कार्यक्रमाची सुरुवात म हाविद्यालयाच्या प्रवेश द्वारा-चे पूजन करून व स्व.आ. डॉ. गणपतराव देशमुख यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर स्व.आ. डॉ. गणपतराव देशमुख व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रतिमा पूजनानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धसाडे यांनी केले. त्याम ध्ये त्यांनी असे सांगितले कि महाविद्यालय ३५ व्या वर्षात पदार्पण करत असताना बदल-लेली शिक्षण पद्धती स्विकारणे आणि रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांना मिळवून देणे यावर महाविद्यालयचा अधिक भर असेल. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांची ओळख महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ.सौ. शितल शिंदे यांनी करून दिली. प्रमुख पाहुण्यांच्या ओळखीनंतर प्रमुख मान्यवरांच्या सत्कार समारंभाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर डॉ. दिनेश शिंदे, डॉ. गणेश वाघ, डॉ. बाबासाहेब शिंदे, कु. प्रतिभा जोग यांसारख्या महाविदयालयामध्ये यशस्वी झालेल्या अनेक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

ा कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. प्रभाकर कोळेकर सम न्वयक, पीएम-उषा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोला-पूर विद्यापीठ, सोलापूर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले कि डॉ. गणपतराव देशमुख सारख्या तत्वनिष्ठ माणसाने स्थापन केलेल्या संस्थेत मला बोलताना खूप गौरव वाटतो. शिक्षण क्षेत्रात आलेले खाजगीकरण, अपुरे फंडिंग या सारखी अनेक आव-ाहने संस्थेने स्वीकारून पुढे गेले पाहिजे. ग्लोबल समस्येपेक्षा स्थानिक समस्या सोडवण्यावर सर्वांचा भर अधिक असला पाहिजे. त्यासाठी समायोजन, प्रबोधन, सातत्य याचा वापर करून अनेक समस्या सोडवल्या पाहिजेत. प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनिकेत(भैय्या) देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये त्यांनी असे सांगितले कि शिक्षणाबद्दल आणि श्रमाबद्दल कर्मवीर अण्णांना खूप अस्था होती. शिक्षणाची गंगा खेड्यापाड्या पर्यंत पोहचवण्यासाठी डॉ. गणपतराव देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले होते. शिक्षण, व्यायाम, आरोग्य यावर विद्यार्थ्यांनी विशेष भर दिला पाहिजे असे सांगितले.

सोशल मीडिया व आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांचा वापर योग्य प्रमाणात असावा असे त्यांनी सांगितले.

कर्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेच्या संचालिका डॉ. सौ. आस्था अनिकेत देशम ुख, संस्थेचे सचिव मा. श्री. विठ्ठलराव शिंदे, संस्था सदस्य मा.श्री. अवधूत कुमठेकर, संस्था सदस्य मा.डॉ. अश-ोक शिंदे, संस्था सदस्य मा.श्री. दिपक खटकाळे, संस्था सदस्य मा.श्री. जयंत जानकर व न्यू इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेजचे प्राचार्य प्रा. केशन माने, माजी नगरसेवक गजानन बनकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सौ. शितल शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.डॉ. जे.व्ही. ठोंबरे व प्रा. शेख एन. एस यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी विशेष परिश्रम घेतले होते. अशी माहिती प्रसिद्धी कमिटीचे चेअरमन प्रा. बाळासाहेब सरगर यांनी दिली आहे.

# वागदरी येथे भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड): : तुळजा-पूर तालुक्यातील वागदरी येथे विघ्नहर्ता गणरायाला भक्तिमय वातावरणात पारंपारिक वाद्यांच्या गजरात, भजनी मंडळाच्या तालात तर लेझीम संघाच्या जोशात गणरायाला निरोप देण्यात आला.

येथील शिव गणेश तरुण मंडळाच्या वतीने वागदरी येथे गणेश मंडळाने गणरायाच्या आगमना प्रित्यार्थ गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केली होती. गणेश मूर्ती स्थापनेपासून ते गणेश विसर्जन कालावधी पर्यंत शिव गणेश तरुण मंडळाच्या वतीने दररोज नित्य नियमाने गणेश आरती सह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शेवटी दिनांक २५ सप्टेंबर २०२६ रोजी कर्कश्य डॉल्बीला फाटा देत गणेश मंडळाने पारंपारिक वाद्य श्री संत भगवान सिंग महाराज भजनी मंडळाच्या दिंडीच्या तालात, गावातील चिम ुकल्यांचा लेझीम संघाच्या जोषात अत्यंत भक्तिमय वातावरणामध्ये आपल्या लाडक्या गणरायाला निरोप देण्यात आला. वागदरी हे गाव श्री संत भगवानसिंग महाराज देवस्थानामुळे वारकरी सांप्रदायाचा वारसा लाभलेले गाव म्हणून सर्वत्र परिचित आहे. शासनाने निर्देश केल्याप्रमाणे डॉल्बी विरहित गणेश मिरवणूक या संकल्पनेची प्रत्यक्षात आमलं बजावणी करत येथील शिव गणेश तरुण मंडळाने डॉल्बी शिवाय पारंपारिक वाद्य भजनी मंडळाच्या तालात व लेझीम संघाच्या जोशात अत्यंत मनोभावे भक्तिमय वातावरणात गावा-तून गणरायाची भव्य मिरवणूक काढून गणपती बाप्पा मोरया.. ी पुढच्या वर्षी लवकर या..ी अशा जयघोष करत गणरायाला निरोप देण्यात आला. या मि रवणुकीमध्ये शिव गणेश तरुण मंडळाचे सर्व पदाधिकारी सदस्य गावातील सर्व ग्रामस्थ महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# आथर्डी येथे पोषण महा कार्यक्रम संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : दिं. २१ सप्टेंबर रोजी आथर्डी येथे एकात्मिक बाल विकास सेवा कार्यालय कळंब यांच्या अंतर्गत आथर्डी येथे पोषण महा कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमालाअध्यक्षस्थानी ईटकूर बीट च्या पर्यविक्षिका ऋतुज्या देशमुख होत्या, क्रार्यक्रमाला उपस्थित गरोदर माता, स्तनदा माता, किशोरवयीन मुली यांना मार्गदर्शन करताना म्हंटले की दरवर्षी सप्टेंबर महिना देशभरात 'राष्ट्रीय पोषण माह' (National Poshan Maah) म्हणून साजरा केला जातो. पोषण माह अभियान माहितीउद्देश: बालके, किशोरवयीन मुली, गर्भवती महिला आणि स्तनदा माता यांच्या पोषणात सुधारणा करणे. हा या पो-षण महाअभियानाचा मुख्य उद्देश आहे. यावेळी इटकुर बीट च्या सर्व अंगणवाडी सेविका व मदतनिस यांनी प्रात्यक्षिक स्वरूपात सर्व प्रकारचे पोषण युक्त पदार्थ तयार करून आणले होते.

हा पोषण अभियान कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावचे पोलिस पाटील अम ोल साखरे व बीट मधील सर्व अंगणवाडी सेविका व मतदनिस यांचे सहकार्य लाभले, तर सांगता समारोप आभार सुप्रिया साखरे यांनी केले.

# माझी राजकीय कारकीर्द घडवण्यात अजीम नवाज राही यांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा वाटा : आ. साजिद खान पठाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : काही प्रेणादायी माणसे संघर्षाच्या रखरखत्या वैशाखात आपल्यासोबत घनगर्द सावलीप्रमाणे वावरत असतात. आपल्या आयुष्यातला ग्रीष्म संपला अन् वसंताचे आगमन झाले की गाजावाजा न करता गुपचूप पडद्याम ागे निघून जातात.माझ्या पहिल्या नगरसेवकाच्या निवडणूकीपासून तर आमदार होईपर्यंत पदोपदी म ाझ्यासोबत वावरणारी मायेची सा-वली म्हणजे अजीम नवाज राही. प्रत्येक प्रतिकूल परिस्थितीत अजीम नवाज राही यांची मोलाची साथ मला मिळाली. अगदी लहान वयापासून अजीम नवाज राही यांच्याशी

माझे भावनिक नाळ जुळलेली. शालेय शिक्षणाच्याकाळात दोन म हिन्यांच्या सुट्ट्यांमध्ये राही यांच्या साखरखेर्डा गावी हक्काचे जाणे,येणे. माझी कारकीर्द घडवण्यामध्ये त्यांच्या लेखणीचा,वाणीचा,मोलाचा




वाटा आहे असे भावनिक प्रतिपादन अकोला पश्चिम विधानसभा म तदारसंघाचे आमदार ,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अ. वि. चे प्रदेशाध्यक्ष साजिद खान पठाण यांनी केले.

१८ सप्टेंबर रोजी नांदुरा शहराच्या आठवडीबाजार परिसरात फ़िरदोस फ़ंक्शन हॉलच्या भव्यदिव्य उदघाटन सोहळ्यात ते बोलत होते. उदघाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष हाजी रशीद खान जमादार,मलकापूर नांदुरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार चैनसुख संचेती, मराठवाडा वक्फ बोर्डचे माजी अध्यक्ष इक्बाल पाशा, महाराष्ट्र राज्य मौलाना अबुल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शाह आलमखान, बुलडाणा जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवारचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब प्रसेनजीत पाटील,मलकापूर न प नगराध्यक्ष अतिकभाई जवारीवाले, जळगाव जिल्हा भाराकॉ अध्यक्ष जमील शेख, नांदुरा न प नगराध्यक्ष सुधीरभाऊ मुऱ्हेकर, बुलडाणा जिल्हा रा कॉ जेष्ठनेते वा.स पाटील, आमेना अजीज उर्दू हायस्कुल देऊळगावराजाचे अध्यक्ष हाजी आलम खान कोटकर,।प्रख्यात उर्दू शायर नईम फराज, संगणकक्षेत्रातील नामांकित व्यक्तिमत्व सदरुलउला पुणे, मलकापूर न प नगरसेवक शहेजाद खान इत्यादी मान्यवर उप-स्थित होते, वक्तृत्वाच्या,निवेदनाच्या ,सूत्रसंचालनाच्या क्षेत्रात ४० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे प्रख्यात मराठी कवी,नामवंत वक्ते,निवेदक अजीम नवाज राही यांचा आयोजक अडव्ह अब्दुल रफीकसेठ,अब्दुल तौफीकसेठ यांच्यावतीने विशेष सत्कार या उदघाटन सोहळ्यात आयोजित करण्यात आला होता. शाल,पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह देऊन

आमदार साजिद खान पठाण यांनी अजीम नवाज राही यांचा म नोभावे सत्कार केला.

प्रारंभी ढोलताश्याच्या निनादात, गुलाबपाकळ्यांच्या वर्षावात,फटाक्यांची आतषबाजीत उदघाटक आमदार साजिद खान पठाण आणि मान्यवरांचे कार्यक्रम परिसरात आगमन झाले.तिला-वते कलामपाकचे पठण राहिल रहीम खान यांनी केले,प्रख्यात उर्दू शायर नईम फराज यांनी आपल्या गोड आवाजात बारगाहे हुजूर पुरनूर हजरत मोहम्मद सललल्लाहो अलैह व सलल्लम यांचे स्तुतीगान म्हणजे नातेपाक सादर करून उपस्थितांची भरभरून दाद मिळवली. मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजक महाराष्ट्र प्रदेश रा कॉ प्रदेश उपाध्यक्ष अडव्ह अब्दुल रफीकसेठ, फिरदोस फँक्शन हॉलचे कार्यकारी संचालक मोहम्मद तौफीकसेठ, फहीम अख्तर, शेख करामत,जुल्फकार भैय्या, हनीफ सर,खालीक सर, आसिफ सर,युनूस सर यांनी केला.

**पंढरपूर तालुक्यातील बागायतदार शेतकऱ्यांच्या हितासाठी फार्मर प्रोड्युसर कंपनी, युट्युपियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक यांची माहिती**

# पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी फार्मर प्रोड्रूसर कंपनीची स्थापना; उमेश परिचारक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना विविध अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. आपल्या शेतकऱ्यांना त्यांच्या विविध फळबागा, आणि त्यांचे उत्प-ादन घेताना योग्य मार्गदर्शन आणि सुयोग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सुधाकर फार्मर प्रोड्रूसर कंपनीची स्थापना करण्यात आली आहे अशी माहिती उमेश परिचारक यांनी दिली व नाशिक येथील सह्याद्री ॲग्रो आणि सुधाकर फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड यांच्यावतीने युट्युपियन शुगरचे अध्यक्ष उमेश परिचारक यांनी बुधवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी कराड रोड येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालयात फळबाग उत्पादक शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते,

यावेळी नाशिक येथील सह्याद्री ॲग्रो ची संस्थापक अध्यक्ष मंगेश भास्कर युट्युपियन शुगरचे कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, ऋषिकेश परिचारक, प्रदीप शिंदे प्रगतशील बागायतदार,

यएफसीएन देशपांडे उद्धव बागल, प्रभारी कृषी अधिकारी दिप-ाली जाधव, आदी मान्यवर उपस्थित होते.

उमेश परिचारक म्हणाले की संस्थेचा मूळ उद्देश म्हणजे पारंपरिक द्राक्ष जाती पिकवताना येणाऱ्या अडचणीचे निवारण करणे तसेच सोलापूर जिल्ह्यात आणि पंढरपूर तालुक्यातील फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळवून देणे आवश्यक आहे, सध्या पंढरपूर तालुक्यात ७६५ एकर द्राक्ष बाग, व ४० हजार एकर डाळिंब, व २२ हजार एकर पेरू, दहा हजार एकर क्षेत्रावर सीताफळ अशी लागवड करण्यात आली आहे.

संपूर्ण जग हे मागणी तसा पुरवठा या तत्त्वावर अवलंबून आहे कोविड नंतर द्राक्ष माळ शेतकऱ्यांना व्यापाऱ्यांच्या मागे लागून कवडीम ोल भावाने विकावा लागला होता.

> **शेतीत काम करण्यासाठी आपल्या जिल्हा तसेच तालुक्यातील मजूर मिळत नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांनी बिहार येथून मजूर आणले आहेत तालुक्यातील युफानी हळद झटकून शेतीमध्ये काम केल्यास चांगला रोजगार उपलब्ध होईल असे मत प्रचारक यांनी व्यक्त केले.**

सह्याद्री ॲग्रो ही पारंपारिक द्राक्ष जाती, त्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान युनिट उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

ॲग्रो च्या मतीने सभासदांनी ३०० एकर लागवड केली असून १५० एकर फळ मार्च महिन्यात येईल अशी माहिती उमेश परिचारक यांनी दिली,

कॅलिफोर्निया येथील विशिष्ट प्रकारच्या द्राक्ष जाती सह्याद्री ॲग्रोवनने दिल्या आहेत या द्राक्ष रोपांना औषधी लागत नाहीत, कमी प्रमाणात औषध लागतात उत्तम गुणवत्ता असल्याने १६० ते १७० रुपये दर मिळाला आहे.

सोलापूर जिल्हा आणि पंढरपूर तालुका या परिसरात वातावरण कोरडे हवामान असलेले असून सूर्यप्रकाश स्वच्छ असल्याने द्राक्ष बागेसाठी हे पोषक हवामान आहे सध्या सुधाकर फार्मर प्रोड्रूसर कंपनी लिमिटेड ७२४ सभासदा असून त्यांच्या विविध प्रकारच्या मार्गदर्शनाचा उपयोग शेतकऱ्यांना होत आहे जिओ टॅगिंग वॉल्टेड ऑर्गनायझेशन यांच्या म ाध्यमातून सभासद शेतकऱ्यांना द्राक्ष तसेच इतर फळांना योग्य दर मिळत आहे.

शेतकरी मेळाव्यात ४५० फळउत्पादक शेतकरी उपस्थित होते सुरुवातीला उपस्थित सर्व शेतकऱ्यांना मंगेश भास्कर यांनी सुमारे दोन तास मार्गदर्शन केले.

# श्री विठ्ठल कारखान्याची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, ४५ वा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ व मोळी पुजन कार्यक्रम संपन्न

## सहकारातुन आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी प्रयत्नशील : आमदार अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/वेणुनगर : श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याची अधिमंडळाची ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २६.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता कारखाना कार्यस्थळावर कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत धनंजय पाटील यांचे अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या सुरुवातीस श्री विठ्ठलाच्या प्रतिमेचे पुजन, कारखान्याचे संस्थापक-चेअरमन कर्मवीर कै. औदुंबरआण्णा पाटील, संस्थापक-व्हाईस चेअरमन यशवंतभाऊ पाटील, दिवंगत सर्व माजी चेअरमन यांच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित जेष्ठ सभासदांचे शुभहस्ते करण्यात आले.

तसेच श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचा सन २०२६-२७ गळीत हंगामाचा ४५ वा बॉयलर अग्नि प्रदिपन समारंभ शनिवार दिनांक २६.०९.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता जगद्गुरु संत श्री तुकोबाराय यांचे वंशज ह.भ.प.प्रा. श्रीगुरु बाळासाहेब महाराज देहूकर यांचे शुभहस्ते व होम पुजन श्री अमोल अभिमान शेळके व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुरेखा, कारखान्याचे संचालक श्री जनक माणिक भोसले त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. स्नेहल, कारखान्याचे चेअरमन, आमदार श्री अभिजीतआबा पाटील, सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक श्री डी. आर. गायकवाड यांचे उपस्थितीत कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

तसेच सन २०२६-२७ चा ४५ वा गळीत हंगामाचा शुभारंभ श्री विठ्ठल सुतगिरणीचे चेअरमन श्री दिनकर दत्तात्रय पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अरुणा यांचे शुभहस्ते कलश पुजन होवून उपस्थित कारखान्याचे जेष्ठ सभासद यांचे शुभहस्ते,






कारखान्याचे चेअरमन, आमदार श्री अभिजीतआबा पाटील, व्हा. चेअरमन सौ. प्रेमलता रोंगे, मार्गदर्शक स्वेरी शैक्षणिक संकुलाचे सचिव प्रा.बी. पी.रोंगे सर, सर्व संचालक मंडळ, कार्यकारी संचालक श्री डी. आर. गायकवाड तसेच शेतकरी, सभासद, तोडणी वाहतुक ठेकेदार, अधिकारी व कामगार यांचे उपस्थितीत कारखाना कार्यस्थळावर संपन्न झाला.

याप्रसंगी जगद्गुरु संत श्री तुकोबाराय यांचे वंशज ह.भ.प.प्रा. श्रीगुरु बाळासाहेब महाराज देहूकर हे यांनी आर्शिवाद रुपी शुभेच्छा देताना म्हणाले की, १२५०० मे. टन गाळप क्षमता असलेले महाराष्ट्रात हाताच्या बोटा एवढेच कारखाने आहेत, त्यामध्ये श्री विठ्ठल कारखाना आहे. हि गौरवाची बाब आहे, या कारखान्यात साखरे बरोबरच इतर उपपदार्थांची निर्मिती केली जाते, त्यामुळे हा कारखाना चेअरमन आमदार अभिजीत आबा पाटील यांचे मार्गदर्शनाखाली निश्चित प्रगतीपथावर राहील, अशी भावना व्यक्त केली आणि येणारा गळीत हंगाम यशस्वी होणेसाठी शुभेच्छा दिल्या.

वार्षिक सभेचे आरंभी कारखान्याचे कार्यलक्षी संचालक प्रा. तुकाराम मस्के यांनी सर्व उपस्थित सभासदांचे स्वागत केले. कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता बब्रुवाहन रोंगे यांनी श्रध्दांजलीचा ठराव मांडला. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक, श्री डी. आर. गायकवाड यांनी विषय पत्रीकेवरील विषयांचे वाचन केले. या सर्व विषयांना सभासदांनी आवाजी मतांनी व हात उंचावून मंजूरी दिली.

अधिमंडळाच्या ५१ वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये चेअरमन, आमदार श्री अभिजीत (आबा) पाटील यांनी सन २०२५-२०२६ हंगामाचा अहवाल सादर केला.

मागील हंगामाचा लेखाजोखा मांडत असताना सन २०२२ पासून कारखान्याची असलेली आर्थिक परिस्थिती व वाढलेली गाळप क्षमता, कारखान्याने दिलेला ऊसाचा दर, यंत्रसामुग्रीमध्ये केलेली आधुनिक सुधारणा, कारखान्याच्या शैक्षणिक संकुलामध्ये केलेल्या सुधारणा, वृक्ष लागवड तसेच परिसर विकास यासह दिर्घकालीन अडकुन राहिलेले कर्मचाऱ्यांचे पगार, हुद्दा व कायम वर्गवारीचे विषय अशा विस्तृत विषयांवर भाष्य करत असताना १२५० टीसीडी क्षमता असणारा कारखाना येणाऱ्या हंगामात १२५०० टीसीडी क्षमतेने चालणार आहे. कारण मागील दोन वर्षात ८० कोटी रुपयेची गुंतवणूक करुन कारखान्यात आधुनिकीकरण दुरुस्तीकरण केलेले आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आपला कारखाना १२५०० मे.टन प्रतिदिन क्षमतेने चालणार आहे. मागील चार वर्षामध्ये कारखान्याने एफ.आर.पी. पेक्षा जादा दर दिल्यामुळेही तोटा सहन करावा लागला आहे हे त्यांनी नमुद केले. तसेच सन २०२५-२६ मधील आसवणी, सहवीज निर्मिती प्रकल्पाचे माध्यमातुन झालेले उत्पादन व विक्रीचा अहवाल सभासदांसमारे मांडण्यात आला.

यावेळी सभासदांच्या लेखी प्रश्नांची उत्तरे देताना मागील व चालू आर्थिक स्थिती व अडचणीचे विस्तृत विवेचन करुन सभासदांच्या सर्व प्रश्नांची व शंकेचे निरसन केले.

मागील काही दिवसांपासून समाजमाध्यमांव्दारे आपला कारखाना व कारखान्याचे संचालक मंडळाची बदनामी करण्याचा प्रयत्न काही कारखाना विरोधी भूमीका असणाऱ्या लोकांकडून केला जात आहे. अशा प्रवृतीच्या लोकांना कारखाना सभासद त्यांची योग्य जागा दाखवतील याची मला खात्री आहे. आज कारखान्याचे सभासदां समोर सर्व लेखाजोखा मांडून कारखान्यावर असलेले कर्ज फेडणेसाठी उत्पन्न वाढविणे गरजेचे आहे. कारखान्याचे आर्थिक नियोजन व विकास यामध्ये कसलीही तडजोड केली जाणार नाही, असे यावेळी त्यांनी सांगितले.

आपले कारखान्याचे आसवनी प्रकल्पामध्ये सुधारणा करुन १०० के.एल.पी.डी. क्षमतेचा इथेनॉल प्रकल्पाचे काम सुरु केलेले होते, परंतु शासनाकडून इथेनॉल धोरण बंद केल्याने अडचण निर्माण झाली आहे. केंद्र शासनाचे धोरणामध्ये साखरेची किंमत कमी व ऊसाची किंमत जास्त अशी तफावत असले कारणाने महाराष्ट्रातील सर्व साखर कारखान्यांना नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. याकरिता साखरेचे किमान विक्री मुल्य (एम.एस.पी.) ४७०० ते ४८०० असणे गरजेचे असल्याचे सांगीतले.

कारखाना कार्यस्थळावर बायोसीएनजी ३ टन प्रकल्पाची बांधा वापरा व हस्तातंर करा या तत्वावर उभारणी करुन प्रकल्प कार्यान्वीत केलेला आहे. पुढील वर्षी कारखाना मालकीचा ४ टन क्षमतेचा प्रकल्प उभा करणेचा मानस त्यांनी व्यक्त केला.

आपले कारखान्यामार्फत श्री विठ्ठल कृषी महाविद्यालयाची शासनाची मंजुरी मिळालेली असून शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ पासून प्रत्यक्ष सुरु झालेले आहे. यासाठी विशेष करून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, कृषि मंत्री मा.श्री दत्तात्रय भरणे साहेब यांचे यासाठी सहकार्य लाभले.

कारखान्याचे शैक्षणिक संकुलामध्ये सिनियर महाविद्यालय, इंग्लिश मेडियम स्कूल, आयटीआय, डी फार्मसी व बी फार्मसी तसेच बी.एड व एम.एड कॉलेज सुरु करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मा. उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार यांचे कोट्यातुन कुस्ती संकुलासाठी २ कोटी निधी प्राप्त होणार असून त्यांचेही आभार व्यक्त केले. इंडोअर स्टेडिमसाठी प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे त्याकरीता रु.१.२५ कोटी निधी मंजूर झालेला असून सदर स्टेडियममध्ये वेगवेगळे २८ खेळ खेळता येणार आहेत.

तसेच हंगाम २०२४-२५ मध्ये गळीतास आलेल्या ऊसाला रु.३५००/- दर देणेचे जाहिर करण्यांत आलेला होता. त्यापैकी आजवर प्र.मे. टन रु.३००३/- अदा केलेले असून उर्वरीत रकमेपैकी माहे जानेवारीमध्ये जाहीर केलेनुसार रु.१००/- दिपावली सणासाठी अदा करणार असल्याचे सभासदांना सांगितले असून, उर्वरीत रक्कम टप्याटप्याने अदा केले जातील असे सांगितले.

तसेच कामगारांसाठी राज्यस्तरीय त्रिपक्षीय समितीच्या झालेल्या निर्णयानुसार माहे सप्टेंबर २०२६ पासून १० टक्के पगार वाढ लागू करणेत येणार आहे. याशिवाय दिपावली सणानिमित्त कामगारांना एक महिन्याचा पगार (८.३३ टक्के) बोनस देणार असल्याचे जाहिर केले. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे थकीत देय रकमेबाबत झालेल्या करारानुसार रक्कम अदा करणेस सुरु असून लवकरच ठरल्याप्रमाणे रक्कम अदा केली जाईल. सध्या कामावर असणारे कर्मचारी यांचे मागील ३१ महिन्याचे कारखाना बंद कालावधीतील कारखाना व कामगार यांच्यामध्ये झालेल्या करारानुसार थकीत पगार व इतर देणी अदा करणेच्या अनुषंगाने मा. साखर आयुक्त यांनी कारखान्यातील भंगार विक्री करण्यास मंजुरी दिली असून लवकरच ठरल्याप्रमाणे त्यांची ही देणी अदा केली जातील.

उपस्थितीत सभासदांनी आजवर कारखान्यास व संचालक मंडळास दिलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करुन येणाऱ्या गळीत हंगामासाठी इतर कोणाच्याही भुलथापांना बळी न पडता १०० टक्के ऊस आपल्याच कारखान्याला पाठवावा, असे आवाहन केले.

या सभेसाठी संचालक सर्वश्री संभाजी भोसले, कालिदास पाटील, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, कालिदास साळुंखे, सचिन वाघाटे, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, सिताराम गवळी, अशोक जाधव, सिध्देश्वर बंडगर, समाधान काळे, श्रीमती कलावती खटके, सौ. सविता रणदिवे, तज्ञ संचालक दशरथ जाधव, अशोक तोंडले, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, तानाजी बागल, सचिन शिंदे-पाटील, समाधान गाजरे, धनाजी खरात, उमेश मोरे, गणेश ननवरे, एम.एस.सी. बँकेचे प्रतिनिधी सी.एस. पाटील, मोठ्या संख्येने कारखान्याचे माजी संचालक, सभासद, सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

सर्व उपस्थित सभासदांचे संचालक श्री दिनकर चव्हाण यांनी आभार मानले व सुत्रसंचलन प्रा.श्री नागटिळक सर यांनी केले.

# रांजणीत नवयुवक गणेश मंडळाचा आदर्श उपक्रम - ४९ वर्षांपासून 'एक गाव एक गणपती' परंपरा कायम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील रांजणी येथेल गणेशोत्सव केवळ उत्सव न राहता एकतेचे आणि भक्तीचे प्रतीक ठरला आहे. येथील नवयुवक गणेश मंडळ, रांजणी यांनी आपली ४९ वर्षांची अखंड परंपरा जपत यंदाही 'एक गाव एक गणपती' हा अभिनव आणि आदर्श उपक्रम मोठ्या उत्साहात राबविला.

गावात एकच सार्वजनिक गणपती बसवून गावची एकजूट कायम राखण्याची ही परंपरा गेली ४९ वर्षांपासून अविरत सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून यंदाही मंडळाच्या

### हिंदू-मुस्लिम एकतेचा दिला संदेश

वतीने भव्य अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने करण्यात आली.

या सोहळ्याच्या सांगता प्रसंगी प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. संतोष महाराज सोळंके (आंमलेकर) यांची काल्याची कीर्तन सेवा झाली. त्यांच्या सुमधुर वाणीने आणि प्रबोधनात्मक कीर्तनाने उपस्थित भाविक भक्तिमय झाले. या वेळी गावातील आणि पंचक्रोशीतील सर्व भजनी मंडळ, महिला मंडळ, वारकरी संप्रदायातील भाविक, ज्येष्ठ नागरिक, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिंदू-मुस्लिम एकतेचा आदर्श -

**या उत्सवाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी हिंदू-मुस्लिम समाज बांधवांनी खांद्याला खांदा लावून उत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. हा गणेशोत्सव केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक सलोख्याचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरला.**

### रोषणाईने उजळले गाव -

**या गणेशोत्सवामध्ये गावातील प्रमुख आकर्षण म्हणजे विद्युत रोषणाई होती. गणपती मंदिर, हनुमान मंदिर, गावातील मशिद, दर्गा परिसर तसेच मुख्य ग्राम रस्त्यावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. संपूर्ण रांजणी गाव या रोषणाईने आणि अखंड हरिनामाच्या भक्तीमय वातावरणामध्ये उजळून निघाले होते. रात्रीच्या वेळी गावात जत्रेचे स्वरूप आले होते.**

### परंपरा कायम राखली -

**हा सप्ताह आणि गणेशोत्सव शांततेत आणि व्यवस्थित पार पाडण्यासाठी नवयुवक गणेश मंडळ, रांजणीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. गावातील ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली युवकांनी एकत्र येत हा उत्सव आदर्श पद्धतीने पार पाडला.**

**एक गाव एक गणपती ही संकल्पना आज अनेक गावांसाठी आदर्श असून रांजणीकरांनी ४९ वर्षांपासून ती जपली आहे, याबद्दल पंचक्रोशीतून त्यांचे कौतुक होत आहे.**

## तुळशी ग्रामस्थांची जलसंपदा मंत्री यांच्यासमवेत आज मुंबईत बैठक संपन्न

# आमदार अभिजीत पाटील यांनी तुळशी ग्रामस्थांना दिलेला शब्द पाळला





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी : काही दिवसांपूर्वी तुळशी येथे सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून पाणी मिळावे, या मागणीसाठी ग्रामस्थ व शेतकरी आमरण उपोषणाला बसले होते. त्यावेळी आमदार अभिजीत पाटील यांनी उपोषणस्थळी भेट देऊन राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून ग्रामस्थांच्या मागणीवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी बैठक घेण्याचे आश्वासित केले असता आज दि.२२ सप्टेंबर रोजी मंत्रालय मुंबईत सकारात्मक बैठक पार पडली.

यावेळी तुळशीसह संबंधित ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची दालनात भेट घेऊन या प्रश्नावर सविस्तर चर्चा केली.

सदर बैठकीत तुळशी, परितेवाडी, बावी, अंजनगाव खुर्द यांच्यासह इतर ३ गावांचा सीना-माढा उपसा सिंचन योजनेत समावेश करून सुप्रमा-३ मंजूर करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

या प्रस्तावासाठी आवश्यक विविध विभागांच्या मान्यता मिळाल्या असून आता केवळ मंत्रिमंडळाच्या मंजुरीचा टप्पा बाकी आहे. हा विषय लवकरच मंत्रिमंडळासमोर मांडून मार्गी लावण्याचे आश्वासन जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील दिले असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

तुळशीसह संबंधित गावांतील शेतकरी व ग्रामस्थांच्या हक्काच्या पाण्यासाठी हा पाठपुरावा सातत्याने सुरूच राहील. हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागून संबंधित गावांना सीना-माढा उपसा सिंचन योजनेचे पाणी मिळावे, यासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

## बसवेश्वर गणेश मंडळ सारणी गणरायाला भक्तिमय वातावरणात निरोप

**डीजे नाही डॉल्बी नाही डीजेच्या कर्कश आवाजाला ब्रेक**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



औसा प्रतिनिधी/अमर जाधव : गणेश उत्सव म्हणले की सध्या डीजे डॉल्बीच्या कर्कस आवाजात निघणाऱ्या मिरवणुका सर्वत्र पाहायला मिळतात मात्र या आधुनिक धामधुमीला फाटा देत बसवेश्वर गणेश मंडळाने ढोल ताशाच्या गजरात गणेश विसर्जन मिरवणूक काढली.

या आगळ्यावेगळ्या मिरवणुकीणे सारणी करांचे विशेष लक्षवेधून घेतले. बसवेश्वर गणेश मंडळाच्या वतीने गणेश मंडळाचे आयोजन करण्यात आले होते. यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपारिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली. यानंतर सजवलेल्या ट्रॅक्टर मधून श्री गणेशाची मूर्ती विराजमान करून भक्तीमुळे वातावरणात पारंपारिक व त्यांच्या निनाद यामुळे मिरवणुकीचा वेगळे स्वरूप प्राप्त झाले. डीजे डॉल्बीचा वापर न करता पारंपारिक पद्धतीने गणेश विसर्जन करण्याचा मंडळाचा उपक्रम उपस्थितासाठी कौतुकाचा विषय ठरला. तरुणाने आधुनिकते सोबतच आपल्या पारंपारिक संस्कृतीचे जतन करावे आणि उत्साहातून सामाजिक व सांस्कृतिक संदेश द्यावा असा आदेश या मिरवणुकीतून बसवेश्वर गणेश मंडळांनी निर्माण केला. गणेशोत्सवाच्या माध्यमातून गावामध्ये एकता. शिस्त.सहकार्य. सेवाभाव.आणि आपल्या संस्कृती विषयी आदर निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला.

भक्ती उत्साह आणि आनंदाने भरलेल्या वातावरणात गणरायाला निरोप देताना सर्वांनी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या असा जयघोष केला. बसवेश्वर गणेश मंडळाचे अध्यक्ष दीपक हवालदार उपाध्यक्ष महादेव मेन कुदळे सचिव रवी पाटील सदस्य सिद्धेश्वर गंगने ऋषिकेश बिराजदार व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. या मिरीवणुकीत किल्लारी पोलीस स्टेशन चे पोलीस उपस्थित होते.

**डीजेच्या कर्कश आवाजाला यंदा लगाम**

गणेश विसर्जन मिरवणुकीत डीजेच्या कर्कश आवाजाने होणारा त्रास टाळण्यासाठी प्रशासनाने ध्वनी प्रदूषणावर नियंत्रण ठेवले आहेत.

यंदा विसर्जन मिरवणुकीत कर्कश आवाज कमी झाल्याचे चित्र दिसून आले.